दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. १५ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - ११३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सुविचार

प्रेम म्हणजे फक्त शब्द नव्हेत, तर न बोलता समजून घेणं, संकटात सोबत उभं राहणं, आनंदात वाढ करणं आणि दुःख कमी करणारी निस्वार्थ भावना असते, जी आयुष्याला अर्थ देते.

## माघ मेळ्यात आग लागली

**प्रयागराज:** उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे सुरू असलेल्या माघ मेळाव्यात पुन्हा एकदा भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. गेल्या २४ तासांतील ही दुसरी घटना असून, यामध्ये १० हून अधिक कल्पवासियांचे तंबू जळून खाक झाले आहेत. वारंवार घडणाऱ्या या आगीच्या घटनांमुळे मेळावा परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

## सारांश वृत्त

### उत्तर प्रदेशात ४.५ कोटी नावे वगळली

**लखनौ :** आम आदमी पक्षाने बुधवारी दावा केला की उत्तर प्रदेशाच्या मतदार यादीतून एका महिन्यात ४.५ कोटींहून अधिक नावे वगळण्यात आली आहेत, कारण मतदार यादीत फेरफार करण्यात आल्याचा आरोप केला आहे आणि सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी केली आहे. खासदार संजय सिंह यांनी राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांवर एसआयआरच्या नावाखाली फसवणूक घडवून आणल्याचा आरोप केला.

### मध्य प्रदेशात १५ लाख वृक्षतोडीचा आरोप

**नवी दिल्ली :** मध्य प्रदेशातील विविध प्रकल्पांसाठी यावर्षी १५ लाख झाडे तोडण्याचा प्रस्ताव असल्याच्या आरोपांवरून राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने वन महासंचालक आणि इतरांना नोटीस बजावली आहे. वृक्षतोडीच्या प्रस्तावित प्रकरणाची वृत्तपत्रातील वृत्ताची स्वतःहून दखल घेत हरित मंडळाने या प्रकरणाची सुनावणी केली. एनजीटीचे अध्यक्ष न्यायमूर्ती प्रकाश श्रीवास्तव आणि तज्ज्ञ सदस्य ए सेंथिल वेल यांच्या खंडपीठाने अहवालाची नोंद घेतली, त्यानुसार, भोपाळ, इंदूर आणि ग्वाल्हेरसह विविध ठिकाणी रस्ते, प्रकल्पांसाठी ५० ते १०० वर्षे वयाची १५ लाखांहून अधिक झाडे तोडली जातील.

### मिनी सचिवालयासाठी २१२ कोटी रुपये

**नवी दिल्ली :** दिल्ली सरकारने द्वारका येथे मिनी सचिवालयाच्या बांधकामासाठी २१२.९१ कोटी रुपये मंजूर केले आहेत. इतर जिल्ह्यांमध्ये प्रशासकीय पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश त्यांच्या महसूल विभागाला दिले आहेत. वित्त समितीने द्वारका येथील सेक्टर १० येथे जिल्हा लघु सचिवालय बांधण्यासाठी २१२.९१ कोटी रुपयांचा अंदाजे खर्च मंजूर केला.

### महानगरपालिका निवडणुकीत वादंगाला तोंड फुटले

# आयोगाचे 'पाडू' मशिन वादाच्या भोवऱ्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकीत ईव्हीएमसोबत नव्या 'पीएडीयू' (पाडू) मशीनच्या वापरावरून वाद निर्माण झाला आहे. मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्यासह विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाच्या या निर्णयावर तीव्र आक्षेप नोंदवला असून, मतदान प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत शंका उपस्थित केल्या आहेत. मात्र, निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की 'पीएडीयू' हे केवळ सहाय्यक डिस्प्ले युनिट असून, व्हीव्हीपॅटप्रमाणे कोणतीही कागदी पावती देणारे यंत्र नाही.



मुंबईसह राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी गुरुवारी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने मतदानाच्या वेळी ईव्हीएमसोबत 'प्रिंटींग ऑक्झिलरी डिस्प्ले युनिट' अर्थात पीएडीयू वापरण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या यंत्रणेमुळे राजकीय वातावरण तापले असून, आयोगाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत पीएडीयूच्या वापरावर मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी उघडपणे टीका केली. या नव्या मशीनबाबत कोणत्याही राजकीय पक्षाला आधी माहिती देण्यात आली नाही, असा आरोप त्यांनी केला.

या आरोपांनंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी तातडीने पत्रकार परिषद घेऊन पीएडीयू मशीनबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, पीएडीयू म्हणजे 'डिप्लॉय्ड प्रिंटींग ऑक्झिलरी डिस्प्ले युनिट'. हे एक छोटे सहाय्यक उपकरण असून ते ईव्हीएमच्या कंट्रोल युनिटला जोडले जाते. कंट्रोल युनिटचा डिस्प्ले अचानक बंद पडल्यास किंवा बिघाड झाल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून पीएडीयू उपयुक्त ठरेल.

गगराणी यांनी स्पष्ट केले की, पीएडीयूचा वापर मतदानाची नोंद करण्यासाठी किंवा मतदाराला कागदी पावती देण्यासाठी होणार नाही. हे यंत्र व्हीव्हीपॅटपेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. मतदान प्रक्रियेदरम्यान मोठ्या स्क्रीनवर आवश्यक माहिती स्पष्टपणे दिसावी, यासाठी हे सहाय्यक डिस्प्ले युनिट वापरण्यात येईल. त्यामुळे मतदाराच्या मतावर किंवा निकालावर त्याचा कोणताही परिणाम होणार नाही, असा दावाही त्यांनी केला.

पीएडीयू मशीन हे केवळ बॅकअप स्वरूपाचे असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (भेल) या कंपनीने ही मशीन तयार केली असून, मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी १४० पीएडीयू युनिट्स पाठवण्यात आल्या आहेत. या मशीन मतदान केंद्रांवर ईव्हीएमप्रमाणेच ठेवण्यात येतील. मात्र, त्यांचा वापर केवळ अत्यावश्यक परिस्थितीतच करण्यात येईल, असे गगराणी यांनी सांगितले.

दरम्यान, निवडणूक आयोगाच्या एकूणच निर्णयप्रक्रियेवर टीका होत आहे. ईव्हीएम जुन्या असल्याने त्यात नवी मशीन जोडली जात असल्याचा आरोप होत आहे. ही कोणत्या प्रकारची मशीन आहे, ती काय करते, कशी दिसते, याची माहिती जनतेला आणि राजकीय पक्षांना का दिली जात नाही? असा प्रश्न आहे.

# भोसरी भूखंड घोटाळा खडसेंना दिलासा नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** भोसरी एमआयडीसी भूखंड घोटाळा प्रकरणात माजी महसूलमंत्री एकनाथ खडसे यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणात विशेष न्यायालयात सुरू असलेल्या दोषारोप निश्चितीच्या प्रक्रियेला स्थगिती देण्याची खडसे यांची मागणी उच्च न्यायालयाने फेटाळून लावत कोणतीही अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला आहे.

न्यायालयाने आदेश देताना याचिकेतील विलंबाकडे स्पष्टपणे लक्ष वेधले. दोषारोप निश्चितीची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच याचिका दाखल करण्यात यायला हवी होती. मात्र, उशिरा दाखल करण्यात आलेल्या याचिकेमुळे या टप्प्यावर हस्तक्षेप करणे योग्य नसल्याचे मत न्यायालयाने व्यक्त केले. त्यामुळे विशेष न्यायालयातील पुढील कार्यवाहीस अडथळा आणण्यास उच्च न्यायालयाने नकार दिला आहे.

या निर्णयामुळे आता येत्या १६ जानेवारी रोजी विशेष न्यायालयात एकनाथ खडसे, त्यांची पत्नी मंदाकिनी खडसे आणि जावई गिरीश चौधरी यांच्याविरोधात औपचारिकरीत्या आरोप निश्चित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आरोप निश्चित झाल्यानंतर या प्रकरणाच्या नियमित सुनावणीला वेग येण्याची शक्यता असून, खडसे यांच्यासाठी ही बाब कायदेशीरदृष्ट्या महत्त्वाची ठरणार आहे.

भोसरी येथील एमआयडीसी परिसरातील कथित भूखंड घोटाळा प्रकरण गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. या प्रकरणात माजी महसूलमंत्री एकनाथ खडसे, त्यांची पत्नी मंदाकिनी खडसे आणि जावई गिरीश चौधरी यांच्यावर गंभीर स्वरूपाचे आरोप ठेवण्यात आले आहेत.

# पाकी दहशतवाद्यांची भारताविरोधात गरळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पाकिस्तानमध्ये सुधारणा होण्याची कोणतीही ठोस चिन्हे दिसत नाहीत. आंतरराष्ट्रीय समुदायाच्या सूचनांकडे सातत्याने दुर्लक्ष करत पाकिस्तान केवळ दहशतवाद्यांना पोसत नाही, तर त्यांना सुरक्षित आश्रयही देत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. याच पार्श्वभूमीवर पाकव्याप्त काश्मीरमध्ये (पीओके) लष्कर-ए-तैयबाशी संबंधित दहशतवाद्यांनी पुन्हा भारताविरोधात उघड धमक्या देण्यास सुरुवात केली आहे.

लष्कर-ए-तैयबाचा कुख्यात दहशतवादी अबू मुसा काश्मिरी याचा एक प्रक्षोभक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये तो थेट हिंदूंना लक्ष्य करत शिरच्छेद करण्याची धमकी देताना दिसतो. या व्हिडिओची नेमकी तारीख अद्याप स्पष्ट झालेली नसली, तरी तो पाकव्याप्त काश्मीरमधील असल्याचे सांगितले जात आहे. व्हिडिओमध्ये अबू मुसा म्हणतो, "काश्मीरचा प्रश्न केवळ दहशतवाद आणि जिहादनेच सोडवता येईल. स्वातंत्र्य भीक मागून मिळत नाही, ते हिंदूंचा शिरच्छेद करूनच मिळवावे लागेल," अशी गरळ त्याने ओकली आहे. या प्रक्षोभक भाषणात अबू मुसाने पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचा उल्लेख करत, त्यांच्या समोरच काश्मीर प्रश्न जिहादच्या माध्यमातूनच सोडवला पाहिजे, असे आपण यापूर्वीही सांगितल्याचा दावा केला आहे. यामुळे दहशतवादी संघटनांचा थेट प्रवेश पाकिस्तानच्या सत्ताकेंद्रांपर्यंत असल्याचे गंभीर संकेत मिळत आहेत.

### मुंबईत ठाकरेंची तर राज्यात भाजपाची प्रतिष्ठा पणाला

# राज्यात २९ महापालिकांसाठी आज मतदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली महापालिका निवडणुकीची रणधुमाळी मंगळवारी सायंकाळी प्रचाराच्या समाप्तीसह थांबली आहे. आता गुरुवारी १५ जानेवारी रोजी सकाळी मतदान होणार असून शुक्रवारी १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहेत. यंदा राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांसाठी निवडणूक होत असून, या लढतीकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. जालना आणि इचलकरंजी या दोन नव्या महापालिकांचा यंदा प्रथमच निवडणूक प्रक्रियेत समावेश झाला आहे.





या निवडणुकांमध्ये राज्यभरात भाजपची प्रतिष्ठा पणाला लागली असून, विशेषतः मुंबईत ठाकरे बंधूंची राजकीय ताकद पुन्हा एकदा कसोटीला लागणार आहे. त्यामुळे निकाल काय लागतो, याबाबत राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून होणारे सत्तासमीकरण राज्याच्या एकूण राजकारणावर परिणाम करणारे ठरते, यामुळेच या निवडणुकांकडे विशेष लक्ष दिले जात आहे. मागील महापालिका निवडणुकीत राज्यातील २७ महानगरपालिकांसाठी मतदान झाले होते. त्या निवडणुकीत भाजपने जोरदार कामगिरी करत तब्बल १७ महानगरपालिकांमध्ये एकहाती सत्ता स्थापन केली होती. याशिवाय तीन महापालिकांमध्ये भाजप-शिवसेना युतीची सत्ता होती. शिवसेनेला स्वतंत्रपणे केवळ दोन महापालिकांमध्ये सत्ता मिळाली होती. काँग्रेसकडे चार महापालिका होत्या, तर एका महापालिकेत काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसची युती सत्तेत होती. वसई-विरार महापालिका बहुजन विकास आघाडीच्या ताब्यात होती.

महापालिकानिहाय सत्तास्थिती पाहिली, तर मुंबई आणि ठाणे महापालिकांवर शिवसेनेची सत्ता होती. कल्याण-डोंबिवली, अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर येथे शिवसेना-भाजप युती सत्तेत होती. नवी मुंबई, उल्हासनगर, मिरा-भाईंदर, पनवेल, नाशिक, जळगाव, धुळे, मालेगाव, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, सांगली-मिरज-कुपवाड, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर या महापालिकांवर भाजपचे वर्चस्व होते. भिवंडी-निजामपूर, नांदेड-वाघाळा आणि परभणी येथे काँग्रेसची सत्ता होती, तर कोल्हापूरमध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसची युती सत्तेत होती.

या पार्श्वभूमीवर यंदाच्या निवडणुकांत भाजप आपला दबदबा कायम ठेवणार की विरोधक पुन्हा ताकद दाखवणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. गुरुवारी होणाऱ्या मतदानानंतर शुक्रवारी जाहीर होणारे निकाल राज्यातील स्थानिक राजकारणाची दिशा स्पष्ट करणार असून, आगामी राजकीय समीकरणांचे संकेत देणारे ठरणार आहेत.

# भारतीय नागरिकांना इराण सोडण्याचा सल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** इराणमध्ये गेल्या काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या तीव्र आणि प्राणघातक निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर देशातील सुरक्षा परिस्थिती झपाट्याने बिघडत असल्याने तेहरानमधील भारतीय दूतावासाने बुधवारी एक महत्त्वाची आणि तातडीची सूचना जारी केली आहे. या सूचनेत विद्यार्थी, यात्रेकरू, व्यावसायिक, पर्यटकांसह इराणमधील सर्व भारतीय नागरिकांना उपलब्ध असलेल्या सर्व मार्गांचा, विशेषतः व्यावसायिक विमानसेवांचा वापर करून शक्य तितक्या लवकर इराण सोडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दूतावासाने स्पष्ट केले आहे की, "इराणमधील सर्व भारतीय नागरिकांनी उपलब्ध मार्गांचा वापर करून देशातून बाहेर पडावे." नागरिकांनी आपले प्रवास व इमिग्रेशनशी संबंधित सर्व कागदपत्रे पासपोर्ट, व्हिसा आणि ओळखपत्रे सदैव हाताशी ठेवावीत, असेही या सूचनेत नमूद करण्यात आले आहे. कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी नागरिकांनी थेट भारतीय दूतावासाशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

भारतीय नागरिकांसह भारतीय वंशाच्या व्यक्तींनाही विशेष दक्षता घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. निदर्शने सुरू असलेल्या किंवा तणावग्रस्त भागात जाणे टाळावे, स्थानिक परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे, स्थानिक माध्यमांमधील घडामोडींचा मागोवा घ्यावा आणि दूतावासाच्या सतत संपर्कात राहावे, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

इराणमध्ये सुरू असलेली ही अस्थिरता आता २० व्या दिवशी प्रवेश करत असून, देशभरातील सुमारे २८० ठिकाणी निदर्शने झाल्याचे वृत्त आहे. सुरुवातीला दुहेरी अंकी महागाई, बेरोजगारी आणि चलनाच्या तीव्र अवमूल्यनाविरोधात सुरू झालेल्या आंदोलनांचे रूपांतर आता सुरक्षा दलांशी थेट आणि हिंसक संघर्षात झाले आहे. अनेक शहरांमध्ये परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याचे चित्र आहे.

माहितीनुसार, या निदर्शनांमध्ये आतापर्यंत किमान २,५७१ लोकांचा मृत्यू झाला आहे. हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर इराणी प्रशासनाने अनेक भागांत इंटरनेट व दूरसंचार सेवा बंद केल्या आहेत.

# राज्यातील नीट पीजी कट-ऑफमध्ये मोठी कपात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या 'नीट-पीजी' परीक्षेच्या पात्रता गुणांमध्ये मोठी सुधारणा करण्यात आली आहे. तब्बल १८ हजार जागा रिक्त राहिल्याने नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकल सायन्सेसने कट-ऑफ चक्क 'शून्य' आणि '७' पर्सेंटाइलपर्यंत खाली आणला आहे. या निर्णयामुळे आता ८०० पैकी वजा ४० (-४०) गुण मिळवणारे उमेदवारही एमडी आणि एमएस कोर्सेसच्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होऊ शकणार आहेत.

पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणाच्या जागा रिक्त राहू नयेत, हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश आहे. पहिल्या दोन फेऱ्यांनंतर अनेक जागा रिक्त राहिल्या आहेत, तसेच काही नवीन जागांची भर पडली आहे. या जागा भरण्यासाठी जास्तीत जास्त उमेदवारांना संधी मिळावी म्हणून हे पाऊल उचलण्यात आले आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी या निर्णयावर तीव्र चिंता व्यक्त केली आहे. कट-ऑफ शून्यावर आणल्यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावण्याची शक्यता आहे. "हा निर्णय वर्षानुवर्षे मेहनत करणाऱ्या गुणवंत डॉक्टरांवर अन्यायकारक असून, याचा सर्वाधिक फायदा खासगी वैद्यकीय महाविद्यालयांना होईल. कमी किंवा उणे गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय प्रवेश दिल्यास, वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा आणि रुग्णसेवेवर याचा गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी भीती तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

# ईव्हीएमवर चार वेळा बटण दाबणे अनिवार्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीत मतदान करताना मतदारांनी विशेष दक्षता घेण्याचे आवाहन निवडणूक प्रशासनाने केले आहे. चार सदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार मतदान प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी ईव्हीएमवरील 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' या चारही गटांतील प्रत्येकी एक बटण दाबणे बंधनकारक असल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. चारपैकी कमी बटणे दाबल्यास मतदान अपूर्ण ठरेल आणि मत ग्राह्य धरले जाणार नाही, त्यामुळे ते वाया जाईल.



महापालिकेसाठी गुरुवारी (१५ जानेवारी) मतदान होणार असून शुक्रवारी (१६ जानेवारी) मतमोजणी होईल. चार सदस्यीय प्रभागात चार, तर पाच सदस्यीय प्रभागात पाच वेळा बटण दाबणे आवश्यक आहे. मतदाराने एक, दोन किंवा तीनच उमेदवारांना मत दिल्यास मतदान प्रक्रिया पूर्ण मानली जाणार नाही.

एखाद्या मतदाराला चारपैकी फक्त एका उमेदवाराला मत द्यायचे असल्यास उर्वरित गटांमध्ये 'नोटा' या पर्यायाचे बटण दाबणे आवश्यक आहे. उर्वरित मते आपोआप नोटाला जातील किंवा तीन मते दिली तरी मतदान पूर्ण होईल, असे काही गैरसमज नागरिकांमध्ये पसरले आहेत; मात्र त्याला कोणताही कायदेशीर किंवा प्रक्रियात्मक आधार नसल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.


चार सदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे अनेक मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे मतदान केंद्रांवर मार्गदर्शनासाठी विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. निवडणूक विभागाचे उपायुक्त प्रसाद काटकर यांनी सांगितले की, एखाद्या मतदाराने चारपेक्षा कमी मते दिल्यास केंद्राध्यक्ष त्याला उर्वरित गटांसाठी मत देण्याची किंवा 'नोटा' दाबण्याची विनंती करतील.

### पंतप्रधान मोदींनी केंद्रीय मंत्र्यांच्या घरी साजरा केला पोंगल

# तमिळ संस्कृती ही जगातील सर्वात जुनी संस्कृती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १४ जानेवारी २०२६ रोजी नवी दिल्लीतील केंद्रीय राज्यमंत्री एल. मुरुगन यांच्या निवासस्थानी पोंगल सण उत्साहात साजरा केला. तेथे त्यांनी पारंपारिक पूजा-अर्चा केली, आरती घेतली आणि एका गायीला चारा दिला. पंतप्रधान मोदी सुमारे एक तास या ठिकाणी थांबले. या प्रसंगी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "तमिळ संस्कृती ही जगातील सर्वात जुनी जिवंत संस्कृती असून शतकानुशतके लोकांना जोडते."



या उत्सवात प्रामुख्याने नवीन तांदळापासून बनवलेले वेन पोंगल (खारट) आणि सक्कराई पोंगल (गोड) दिले गेले. याबरोबर नारळाची चटणी, सांभर, वडा, पायसम, केळी आणि हंगामी फळांचा समावेश होता.

मोदी यांनी पुढे सांगितले, "पोंगल आता जागतिक उत्सव बनला आहे. तमिळ समुदाय आणि जगभरातील तमिळ संस्कृती जपणारे लोक तो उत्साहाने साजरा करतात. मला त्याचा भाग असल्याचा अभिमान आहे."

पंतप्रधानांनी पोंगलच्या महत्त्वावर भर देत स्पष्ट केले की, हा सण आपल्याला निसर्ग, कुटुंब आणि समाज यांच्यात संतुलन राखण्याचे महत्व शिकवतो. तो शेतकऱ्यांच्या कठोर परिश्रमाचा सन्मान करतो आणि पृथ्वीचे आरोग्य, माती, जलसंधारण आणि नैसर्गिक संसाधनांचा संतुलित वापर याची आठवण करून देतो. त्यांनी 'मिशन लाइफ', 'एक पेड माँ के नाम' आणि 'अमृत सरोवर' सारख्या पर्यावरणपूरक मोहिमांचा उल्लेख करून या भावनेला प्रोत्साहन दिले.

पंतप्रधान मोदींनी गेल्या वर्षभरातील तमिळ संस्कृतीशी संबंधित कार्यक्रमांची आठवण दिली, ज्यात गंगाईकोंडा चोलापुरमचे १००० वर्ष जुने मंदिर, काशी तमिळ संगम, आणि रामेश्वरममधील पंबन पूल यांचा समावेश आहे.

पोंगल सण १४ ते १७ जानेवारी दरम्यान साजरा केला जातो. यामध्ये भोगी पोंगल, सूर्य पोंगल (थाई पोंगल – मुख्य दिवस), मट्टू पोंगल (गायी व बैलांची पूजा) आणि कानूम पोंगल यांचा समावेश असतो. हा सण मकर संक्रांतीच्या आसपास येतो आणि भारताच्या समृद्ध कृषी परंपरेचे प्रतीक आहे. तमिळनाडूमध्ये हा मुख्य कापणी सण मानला जातो, जो निसर्ग, सूर्यदेव, पशुधन आणि शेतकऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरा केला जातो.

पारंपारिक पद्धतीने पोंगल सणात नवीन तांदळापासून तयार केलेले गोड आणि चविष्ट पदार्थ उघड्यावर मातीच्या भांड्यांमध्ये शिजवले जातात. दूध आणि तांदळ उकळणे ही समृद्धी व शुभतेची चिन्हे मानली जातात. या पारंपारिक सणातून शेतकरी, कुटुंब आणि पर्यावरण यांच्यातील नाळ मजबूत करण्याचा संदेश दिला जातो, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. या उत्सवात पंतप्रधान मोदींचा सहभाग फक्त पारंपरिक सण साजरा करण्यापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्यांनी तमिळ संस्कृती, पर्यावरण आणि कृषी परंपरेला जागतिक पातळीवर प्रोत्साहन देण्याचा संदेश दिला.

# मुंबईत मतमोजणीसाठी नव्या नियमांची अंमलबजावणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या निकालाबाबत यंदा वेगळी कार्यपद्धती राबवण्यात येणार असल्याने अंतिम चित्र स्पष्ट होण्यास अपेक्षेपेक्षा अधिक वेळ लागण्याची शक्यता आहे.

महानगरपालिकेतील सर्व वॉर्डांची मतमोजणी एकाच वेळी न करता ती नियोजनबद्ध पद्धतीने टप्प्याटप्प्याने केली जाणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे काही प्रभागांचे निकाल लवकर समोर येतील, तर काही ठिकाणी निकाल जाहीर होण्यासाठी संध्याकाळपर्यंत प्रतीक्षा करावी लागू शकते.

मुंबईत एकूण २३ ठिकाणी मतमोजणी केंद्रे कार्यरत राहणार आहेत. प्रत्येक केंद्रावर अनेक वॉर्डांची जबाबदारी निश्चित करण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात एकाच वेळी कमी संख्येतील वॉर्डांचीच मतमोजणी होणार आहे. त्यामुळे संपूर्ण शहरात एकाच वेळेस सर्व वॉर्डांचे निकाल लागणार आहेत. नव्या पद्धतीनुसार, मुंबईतील सर्व २२७ वॉर्डांची मतमोजणी एकूण पाच टप्प्यांत पूर्ण केली जाणार आहे. प्रत्येक टप्प्यात ठरावीक संख्येतील वॉर्ड हाताळले जाणार असल्याने काही भागांचे निकाल दुपारनंतर तर काहींचे संध्याकाळपर्यंत समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या निर्णयामुळे यंदा मुंबई महापालिकेच्या निकाल प्रक्रियेकडे राजकीय पक्षांसह सर्वसामान्य नागरिकांचेही लक्ष लागून राहिले आहे.

## संपादकीय

# भाषेचा अभिमान आणि अधिकारांचा समतोल

**भारतासारख्या बहुभाषिक संघराज्यात प्रादेशिक भाषांना बळ देण्याचा प्रयत्न आणि अल्पसंख्य भाषिकांचे घटनात्मक अधिकार यांच्यातील समतोल आव्हानात्मक असाच. केरळमधील मल्याळम भाषा विधेयकाने हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.**

भारताच्या संघराज्याची ओळख ही राजकीय रचनेपुरती मर्यादित नसून, ती भाषिक आणि सांस्कृतिक विविधतेतून आकाराला आलेली आहे. एका बाजूला प्रशासन अधिक प्रभावी, लोकाभिमुख आणि सुलभ करण्यासाठी प्रादेशिक भाषांना प्रोत्साहन देण्याची गरज मांडली जाते, तर दुसऱ्या बाजूला अशा प्रयत्नांमुळे अल्पसंख्य भाषिक समुदायांचे अधिकार, त्यांची ओळख आणि शैक्षणिक स्वातंत्र्य बाधित होऊ नये, ही चिंता सातत्याने व्यक्त होत असते. केरळमधील मल्याळम भाषा विधेयकावर सुरू झालेली चर्चा या दोन्ही टोकांमधील समतोल किती नाजूक आहे, हेच अधोरेखित करते. या विधेयकाचा मूळ उद्देश मल्याळम भाषेला कायदेशीर बळ देण्यापुरताच मर्यादित नाही. सार्वजनिक जीवनात मल्याळमचा वापर वाढवणे, प्रशासन, शिक्षण, न्यायव्यवस्था आणि सरकारी व्यवहार अधिक समजण्यासारखे करणे, तसेच भाषेचा प्रसार हा सामाजिक विकासाचा भाग मानणे, असा व्यापक विचार त्यामागे असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. प्रादेशिक भाषेच्या संवर्धनाचा हा आग्रह अनेक अर्थांनी स्वागतार्हही आहे. जागतिकीकरणाच्या आणि इंग्रजीप्रधान व्यवस्थेच्या काळात स्थानिक भाषा दुय्यम ठरण्याचा धोका नाकारता येत नाही. मात्र, या प्रयत्नांभोवती निर्माण झालेला विरोधही तितकाच महत्त्वाचा आहे. विशेषतः सीमावर्ती भागांतील वास्तव वेगळे आहे. कासारगोडसारख्या जिल्ह्यांमध्ये कन्नड, तुळू आणि अन्य भाषिक समुदाय मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत. अशा ठिकाणी मल्याळमचा अनिवार्य वापर शिक्षणात किंवा प्रशासनात केला गेला, तर तो त्या समुदायांच्या मातृभाषेच्या अधिकारांवर घाला ठरू शकतो, अशी भीती व्यक्त केली जाते. हा विरोध केवळ राजकीय नाही, तर घटनात्मक चौकटीत बसणारा आहे, कारण भाषिक अल्पसंख्यांकांना त्यांच्या भाषेचे संरक्षण आणि शिक्षणाचा अधिकार संविधानाने दिलेला आहे. भाषा ही निव्वळ संवादाचे साधन नाही, हे येथे लक्षात घेणे आवश्यक. भाषा ही व्यक्तीच्या आत्मओळखीचा, सांस्कृतिक वारशाचा आणि सामाजिक आत्मसन्मानाचा भाग असते. विशेषतः शालेय शिक्षणात कोणती भाषा प्रथम शिकवली जाते, याचा परिणाम शैक्षणिक प्रगतीवर होतो असे नव्हे तर मुलांच्या विचारक्षमतेवर, आत्मविश्वासावर आणि समाजाशी नाते जोडण्याच्या प्रक्रियेवरही होत असतो. त्यामुळे भाषा धोरण ठरवताना प्रशासकीय सोयीचा विचार करून चालत नाही; त्याचे सामाजिक आणि मानसिक परिणामही लक्षात घ्यावे लागतात. सरकारकडून असे सांगितले जाते की विधेयकात अल्पसंख्य भाषिकांसाठी आवश्यक त्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. लँग्वेज ऑफ हार्मोनी ही संकल्पना म्हणूनच महत्त्वाची ठरते. प्रादेशिक भाषेचा सन्मान आणि संवर्धन करणे, तसेच भाषिक अल्पसंख्यांकांचे अधिकार जपणे, या दोन गोष्टी परस्परविरोधी नाहीत. योग्य संवाद, परस्पर विश्वास आणि घटनात्मक मूल्यांची स्पष्ट जाणीव असेल, तर या दोहोंमध्ये समतोल साधता येऊ शकतो. भारताचा भाषिक नकाशा अतिशय गुंतागुंतीचा आहे. राजकीय सीमा आणि भाषिक वास्तव अनेकदा एकमेकांशी जुळत नाहीत. सीमावर्ती भागांतील लोकांचे दैनंदिन जीवन, व्यवहार आणि संवाद हे एका राज्यापुरते मर्यादित नसतात. अशा परिस्थितीत भाषा धोरण हे केवळ सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक न राहता सार्वजनिक धोरणाचा संवेदनशील भाग ठरते. शिक्षण, प्रशासन आणि सार्वजनिक जीवनात भाषा हा संघर्षाचा मुद्दा न बनता समन्वयाचे साधन ठरावा, हीच आजची गरज आहे. भाषा जपणे हे राष्ट्रीय ऐक्याला धोका नसून, ते योग्य पद्धतीने केले तर ऐक्य अधिक दृढ करणारे ठरू शकते. मात्र, त्यासाठी समानता, समावेश आणि घटनात्मक मूल्यांची अंमलबजावणी केवळ कागदावर नव्हे तर प्रत्यक्षातही तितक्याच प्रामाणिकपणे झाली पाहिजे. मल्याळम भाषेच्या निमित्ताने मराठी भाषेचाही असाच विचार झाला, तर मराठी जगविण्यासाठी विशेष उपक्रम हाती घ्यावा लागणार नाही, हाच याचा तथ्यांश.

# महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष आणि समीकरणे!

**महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकांनी राजकारणातील सत्तासमीकरणांचा गोंधळ पुन्हा उघड केला आहे. मित्र-विरोधकांच्या बदलत्या भूमिका, तुटलेली युती आणि सत्तेची लालसा यामुळे स्थानिक प्रश्न मागे पडत असून, लोकशाहीच्या हेतूलाच हरताळ फासला जात आहे.**



महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकांच्या निमित्ताने उभे राहिलेले राजकीय चित्र सध्या कमालीचे विस्कळित, अनपेक्षित आणि गोंधळाचे असेच आहे. राज्याच्या राजकारणात ज्या युती, आघाड्या आणि विरोधी रेषा स्पष्ट मानल्या जात होत्या, त्या जवळपास पुसल्या गेल्याचे दिसते. सत्ता मिळवण्यासाठी कोण कोणाच्या सोबत उभा राहील, याचा ठोस अंदाज बांधणे कठीण झाले असून, राजकारणातील नैतिकता हा शब्द केवळ भाषणांपुरता उरल्याचे चित्र आहे. १५ जानेवारीपासून २९ महापालिकांसाठी मतदान होत असताना, महाराष्ट्रातील शहरांमध्ये राजकीय समीकरणे अक्षरशः दर शहरागणिक बदलताना दिसत आहेत. राज्यात सत्तेत एकत्र असलेले पक्ष अनेक ठिकाणी एकमेकांविरुद्ध उभे ठाकले आहेत, तर काही ठिकाणी वर्षानुवर्षांचे कट्टर विरोधक अचानक मित्र बनले आहेत. स्थानिक सत्ता, आर्थिक संसाधने आणि प्रशासकीय नियंत्रण यासाठी सुरू असलेली ही चढाओढ नागरी स्वराज्य या संकल्पनेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरते. पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, ठाणे, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ अशा अनेक शहरांमध्ये वेगवेगळी गणिते मांडली जात आहेत. कुठे महायुतीचे घटक स्वतंत्र लढत आहेत, तर कुठे आघाडीतील पक्ष परस्परविरोधात उतरले आहेत. काही ठिकाणी तर अशी स्थिती आहे की एका शहरात मित्र असलेले पक्ष दुसऱ्या शहरात थेट विरोधक झाले आहेत. या सगळ्या घडामोडींमुळे मतदारच संभ्रमात पडला आहे. मुंबई महानगरपालिका ही केवळ स्थानिक स्वराज्य संस्था नसून ती आर्थिक, प्रशासकीय आणि राजकीयदृष्ट्या राज्यातील सर्वांत प्रभावी सत्ता-केंद्र मानली जाते. तिचे बजेट अनेक राज्यांपेक्षा मोठे आहे. त्यामुळे मुंबईवर नियंत्रण मिळवणे हे कोणत्याही पक्षासाठी प्रतिष्ठेचे आणि ताकदीचे लक्षण मानले जाते. याच पार्श्वभूमीवर ठाकरे बंधू पुन्हा एकत्र येण्याचे संकेत, मराठी अस्मितेचा मुद्दा, तसेच सत्ताधारी गटांची अंतर्गत स्पर्धा या सगळ्यांनी मुंबईचे राजकारण अधिकच तापवले आहे. या सत्तासंघर्षाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांचे दीर्घकाळ रखडलेले निवडणुका. मुंबईसह अनेक महापालिका गेली दोन-तीन वर्षे प्रशासकांच्या ताब्यात आहेत. निवडून आलेले प्रतिनिधी नसल्यामुळे निर्णयप्रक्रिया लोकांपासून दूर गेली आहे. नागरिकांचे प्रश्न, मूलभूत सुविधा, पाणी, कचरा, वाहतूक, आरोग्य यांसारखे विषय दुय्यम ठरले असून, सत्ता कशी मिळवायची आणि टिकवायची, यावरच सर्व राजकीय ऊर्जा खर्च होताना दिसते. नागरी राजकारण हे मूलतः दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेले असते. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सार्वजनिक वाहतूक, शाळा, रुग्णालये या विषयांवर ठोस धोरण अपेक्षित असते. मात्र सध्याच्या निवडणूक वातावरणात या मुद्द्यांवर सुसंगत चर्चा फारशी ऐकू येत नाही. त्याऐवजी कोण कोणाच्या विरोधात आहे, कुठे कोणाला डावलले, कुठे कोणाला घेतले, याच चर्चा जास्त रंगताना दिसतात. राज्यस्तरीय राजकारणाचा प्रभाव स्थानिक स्वराज्यावर पडतो, हे नवे नाही. मात्र सध्या हा प्रभाव इतका वाढला आहे की स्थानिक प्रश्नच मागे पडले आहेत. नगरसेवक, महापौर आणि स्थायी समित्यांच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न सोडवण्याची जी भूमिका अपेक्षित होती, ती भूमिका सत्तासमीकरणांच्या धुरळ्यात हरवताना दिसते. या सगळ्या राजकीय खेळींचा सर्वांत मोठा परिणाम लोकशाही प्रक्रियेवर होत आहे. मतदारांपुढे स्पष्ट पर्याय न राहता केवळ राजकीय गणिते उरली आहेत. विचारसरणी, धोरणे आणि कामगिरी याऐवजी समीकरणे आणि सोयीचे मित्रत्व हेच निकष ठरत असतील, तर नागरी लोकशाहीचा आत्माच कमकुवत होण्याचा धोका आहे. तरीही अंतिम निर्णय मतदारांच्या हाती आहे. शहरांचा विकास, पारदर्शक कारभार आणि जबाबदार नेतृत्व याला प्राधान्य देणारा निर्णय मतदारांनी घेतला, तर या राजकीय गोंधळातूनही सकारात्मक दिशा मिळू शकते.

अन्यथा, सत्तेच्या या खेळात नागरी प्रश्न कायमच बाजूला पडण्याची भीती कायम राहील. महाराष्ट्रातील राजकारण सध्या एका संक्रमणावस्थेत आहे. ही अवस्था अधिक प्रगल्भ लोकशाहीकडे नेईल की केवळ सत्तासंघर्षाच्या दलदलीत आणखी खोलवर घेऊन जाईल, हे येणाऱ्या निकालांवर आणि त्यानंतरच्या कारभारावर अवलंबून असेल.

# निगडीतील लाईट हाऊस येथे नवोदित मतदारांसह शेकडो युवकांनी घेतली मतदानाची शपथ

## पहिल्यांदाच मतदानाचा हक्क बजावणार असल्याने नवोदित मतदारांमध्ये उत्साह

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** "प्रत्येक मत हे लोकशाहीचे बळ आहे. मतदार यादीत नाव असलेल्या प्रत्येक नागरिकाने आपले मतदानाचे कर्तव्य पार पाडले पाहिजे. एवढ्यावरच न थांबता सामाजिक बांधिलकीतून कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच परिसरातील नागरिकांनाही मतदानासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. भारतीय संविधानाने दिलेला मतदानाचा हा महत्त्वपूर्ण हक्क बजावूनच लोकशाही अधिक सक्षम करता येईल," असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी होत असून, मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या उद्देशाने महापालिकेच्या वतीने 'स्वीप' (Systematic Voters' Education and Electoral Participation) अंतर्गत विविध जनजागृतीपर उपक्रम राबविले जात आहेत. या अनुषंगाने महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली निगडी येथील लाईट हाऊस येथे युवकांसाठी विशेष मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी लाईट हाऊसच्या पूजा मोगरे, लखन रोकडे, अभिजित कांबळे, दिपाली वाघुळे, अक्षता घारे, लुईस शेळके, छवी राठोड यांच्यासह शेकडो विद्यार्थी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे यामध्ये यंदा पहिल्यांदाच मतदान करणार असलेले नवोदित मतदारही सहभागी झाले होते. पहिल्यांदा मतदानाचा हक्क बजावण्याची संधी मिळत असल्याने त्यांच्या चेहऱ्यावर उत्सुकता आणि आनंद स्पष्टपणे दिसून येत होता.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मतदान जनजागृतीवर आधारित पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. या पथनाट्यातून लोकशाहीमध्ये प्रत्येक मताचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व प्रभावीपणे मांडण्यात आले. कलाकारांच्या सशक्त अभिनयामुळे उपस्थित युवक भारावून गेले आणि टाळ्यांच्या गजरात त्यांनी पथनाट्य सादर करणाऱ्या पथकाचे मनापासून कौतुक केले.

यानंतर जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी उपस्थित युवकांशी संवाद साधत मतदानाचा अधिकार, त्यामागील संविधानिक मूल्ये आणि लोकशाहीतील नागरिकांची भूमिका याबाबत सविस्तर माहिती दिली. मतदान न करणे म्हणजे लोकशाही प्रक्रियेपासून स्वतःला दूर ठेवण्यासारखे असून, प्रत्येक मतानेच लोकशाहीची घडी मजबूत होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व युवकांनी सामूहिकपणे मतदानाची शपथ घेतली. येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत १०० टक्के मतदान करण्याचा तसेच इतरांनाही मतदानासाठी प्रेरित करण्याचा निर्धार युवकांनी व्यक्त केला.

# निवडणूक काळात सण-उत्सवांमध्ये प्रलोभनास मनाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**२४ तास भरारी व एसएसटी पथकांची नजर**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने लागू केलेल्या आदर्श आचारसंहितेमध्ये सार्वजनिक सण-उत्सवांच्या आयोजनाबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत. त्यानुसार राजकीय पक्षांचे नेते, उमेदवार किंवा कार्यकर्ते सण-उत्सवांच्या कार्यक्रमांमध्ये वैयक्तिकरित्या सहभागी होऊ शकतात; मात्र या निमित्ताने कोणत्याही प्रकारचे वस्तू, रोख रक्कम किंवा भेटवस्तूंचे वाटप करण्यास सक्त मनाई आहे, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

मकरसंक्रांतीचा सण साजरा होत असून, या सणाच्या पार्श्वभूमीवर महिलांना वाण देण्याच्या उद्देशाने राजकीय पक्ष, उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी कोणत्याही प्रकारचे साहित्य, वस्तू किंवा पैशांचे वाटप करू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत. निवडणूक आचारसंहिता कालावधीत भोजनावळी किंवा सामूहिक जेवणाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यासही बंदी घालण्यात आली आहे. प्रशासनाने नागरिकांनाही आवाहन केले आहे की, निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारच्या प्रलोभनाला बळी पडू नये. मत मागण्यासाठी लाच देणे तसेच लाच स्वीकारणे हा गंभीर गुन्हा असून भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १७० नुसार यासाठी एक वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकते, अशी माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या मतदानाचा हक्क निर्भयपणे व प्रामाणिकपणे बजावावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी शहरात एकूण ३४ भरारी पथके व ३४ स्थिर पथके (एसएसटी) कार्यरत असून, ही पथके २४ तास शहरातील विविध भागांवर लक्ष ठेवून आहेत. सण-उत्सवांच्या निमित्ताने आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काटेकोर अंमलबजावणी केली जाणार आहे. कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर वाटप, प्रलोभन किंवा आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्याचे आढळल्यास तात्काळ कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# अजित पवार यांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांच्या कार्यालयावर छापा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मतदान प्रक्रियेदरम्यान "चार बटणे दाबा, अन्यथा मत बाद होईल" अशा अफवा पसरवल्या जात असल्याच्या पार्श्वभूमीवर निवडणूक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की मतदारांनी फक्त आपल्या पसंतीच्या उमेदवारासमोरील बटन एकदाच दाबायचे असून चार बटणे दाबण्याची कोणतीही अट नाही. अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही करण्यात आले आहे.

दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांच्या वाकडेवाडीतील कार्यालयावर पुणे शहर गुन्हे शाखेच्या पथकाने मंगळवारी छापा टाकला. संशयास्पद हालचाली सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी कार्यालयातील कागदपत्रांची तपासणी केली; मात्र कोणतेही बेकायदा किंवा संशयास्पद प्रकार आढळून आला नाही. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले की, प्राप्त तक्रारीच्या आधारे गुन्हे शाखेचे पथक कार्यालयात गेले होते. तपासणीनंतर तक्रारीत तथ्य नसल्याचे निष्पन्न झाले आणि पथक परतले.

# महापालिका निवडणुकीसाठी मतदान साहित्य सुरक्षितपणे मतदान केंद्रांवर दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**२०६७ मतदान केंद्रांवरील १०,३३५ कर्मचाऱ्यांसह पथके सज्ज; उद्याच्या मतदानासाठी सर्व व्यवस्था पूर्ण**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रियेची तयारी अंतिम टप्प्यात आली असून मतदानासाठी आवश्यक असलेले सर्व मतदान साहित्य व मतदान पथके सुरक्षितपणे आपापल्या मतदान केंद्रांवर पोहोचली असल्याची माहिती महापालिकेच्या निवडणूक विभागाचे उपआयुक्त सचिन पवार यांनी दिली. महापालिका क्षेत्रात होणाऱ्या या महत्त्वाच्या निवडणुकीसाठी एकूण २,०६७ मतदान केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. या मतदान केंद्रांवर कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेले १०,३३५ कर्मचारी, यांच्यासह सुरक्षा विभागातील कर्मचारी, शिपाई, मजूर तसेच इतर सहाय्यक पथके मतदान साहित्य घेऊन केंद्रांवर दाखल झाली आहेत. मतदानासाठी आवश्यक असलेली ईव्हीएम यंत्रे, मतदार यादी, सीलबंद साहित्य, मतपेट्या, कागदपत्रे तसेच इतर आवश्यक सामग्री अत्यंत सुरक्षित पद्धतीने मतदान केंद्रांवर पोहोचविण्यात आली आहे.



निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण व निर्भय वातावरणात पार पडावी, यासाठी महापालिका प्रशासनाने काटेकोर नियोजन केले आहे. मतदान पथकांच्या वाहतुकीसाठी पोलीस प्रशासन, वाहतूक विभाग आणि इतर संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने काम केले. संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष लक्ष ठेवण्यात आले असून तेथे अतिरिक्त पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे.

# एअर बलूनच्या माध्यमातून मतदान जनजागृतीला उंच भरारी

## पिंपरी चिंचवड महापालिकेचा स्वीप अंतर्गत अनोखा उपक्रम; १५ जानेवारीला मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी, तसेच प्रत्येक पात्र मतदाराने लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, या उद्देशाने महापालिकेच्या वतीने 'स्वीप' (Systematic Voters' Education and Electoral Participation) अंतर्गत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमांचा भाग म्हणून शहरातील विविध महत्त्वाच्या ठिकाणी एअर बलूनच्या माध्यमातून प्रभावी मतदान जनजागृती करण्यात आली असून, हा उपक्रम नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे.



पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी बुधवार, १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली मतदान जनजागृतीसाठी विविध उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत.

एअर बलूनच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या अनोख्या उपक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेची मुख्य प्रशासकीय इमारत, भक्ती शक्ती चौक, डांगे चौक (थेरगाव), भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृह, रावेत येथील मुकाई चौक, पिंपळे गुरव येथील डायनॉसोर उद्यान, तळवडे चौक तसेच चऱ्होली परिसर आदी ठिकाणी आकर्षक एअर बलून लावण्यात आले आहेत. या बलूनवर मतदान जनजागृतीपर संदेश, मतदानाची तारीख व वेळ, तसेच "प्रत्येक मत महत्त्वाचे आहे" असे प्रेरणादायी संदेश देण्यात आले आहेत. रस्त्यावरून ये-जा करणारे नागरिक, वाहनचालक, विद्यार्थी व युवक या एअर बलूनकडे आकर्षित होत असून, सहज आणि प्रभावी पद्धतीने मतदानाचा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचत आहे. पारंपरिक जनजागृती उपक्रमांबरोबरच अशा नाविन्यपूर्ण माध्यमांचा वापर केल्यामुळे नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

**मतदान करून लोकशाहीचा उत्सव साजरा करावा**

● उपायुक्त अण्णा बोदडे यांनीही स्वीप उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. "पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीने स्वीप अंतर्गत विविध उपक्रम राबविले जात आहेत. एअर बलूनच्या माध्यमातून दिला जाणारा संदेश सर्वसामान्य नागरिकांपर्यंत सहज पोहोचतो. त्यामुळे प्रत्येक पात्र मतदाराने मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा," असे ते म्हणाले. महापालिकेच्या या उपक्रमाला नागरिकांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, शहरात ठिकठिकाणी उडणाऱ्या एअर बलूनमुळे मतदानाचा संदेश अधिक ठळकपणे समोर येत आहे. येत्या १५ जानेवारी रोजी पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक पात्र मतदाराने मतदान करून लोकशाहीचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत आवश्यक असल्याचे अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी सांगितले. "लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने मतदान करणे अत्यंत आवश्यक आहे. एअर बलूनसारख्या नाविन्यपूर्ण माध्यमातून राबविण्यात आलेला हा उपक्रम नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण करत आहे. जास्तीत जास्त मतदारांनी १५ जानेवारी रोजी आपला मतदानाचा हक्क बजावावा," असे आवाहन त्यांनी केले.

# निवडणुकीसाठी पोलीस यंत्रणा सज्ज; १३०६ पिस्तुले जमा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जिल्हा परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेत अडकण्याची शक्यता**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक शांततापूर्ण, भयमुक्त व पारदर्शकपणे पार पडावी यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने कडेकोट बंदोबस्ताची तयारी केली आहे. गुरुवारी होणारे मतदान आणि शुक्रवारी होणारी मतमोजणी प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी शहरात तब्बल ६ हजार ९१ पोलीस अधिकारी व अंमलदार तैनात करण्यात येणार आहेत.

या बंदोबस्तात सहा पोलीस आयुक्त, दोन अपर पोलीस आयुक्त, आठ पोलीस उपायुक्त, विविध कंपन्यांची पथके तसेच विशेष गस्ती पथके सहभागी असणार आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत कोम्बिंग ऑपरेशन, पथसंचलन व मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. आचारसंहिता लागू झाल्यापासून आतापर्यंत ९६२ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून ५० उपद्रवी व्यक्तींना जिल्ह्याबाहेर हद्दपार करण्यात आले आहे. तसेच गुंडगिरी प्रवृत्तीच्या ४३८ जणांना शहराच्या हद्दीबाहेर जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. निवडणूक अनुषंगाने परवानाधारकांकडील एकूण १ हजार ३०६ पिस्तुले जमा करण्यात आली आहेत. शहरातील गर्दीची ठिकाणे, संवेदनशील मतदान केंद्रे तसेच वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असलेल्या भागांमध्ये विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत एकूण ४२० इमारतींमध्ये २ हजार १३५ मतदान केंद्रे असून त्याठिकाणी कडक सुरक्षा व्यवस्था असणार आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### कोरेगाव भीमा येथे नवीन बंगल्यातील केबल चोरी

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा (ता. शिरुर) येथील डिंग्रजवाडी फाटा परिसरात सुरू असलेल्या शुभम कंद यांच्या नवीन बंगल्याच्या इमारतीतून अज्ञात चोरट्यांनी लाईट फिटिंगसाठी बसवलेली हजारो रुपयांची विद्युत केबल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. बांधकाम अंतिम टप्प्यात असून विद्युत फिटिंग करण्यात आली होती. पाहणीदरम्यान केबल गायब असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी शुभम संजय कंद (वय ३०, रा. लोणीकंद, ता. हवेली) यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार श्रावण गुपचे करीत आहेत.

### रूपाली परदेशी जुन्नर उपनगराध्यक्षपदी

**जुन्नर (ता. जुन्नर) :** जुन्नर नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत, जुन्नर शहर विकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या रूपाली परदेशी यांची निवड झाली. मंगळवारी (ता. १३) नगराध्यक्षा सुजाता काजळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत ही निवड जाहीर झाली. सत्ताधारी उमेदवाराचा अर्ज अवैध ठरल्याने राजकीय समीकरणे बदलली. सभेतील प्रोसिडिंगबाबत वाद निर्माण झाल्याने वातावरण तणावपूर्ण झाले होते. प्रशासनाने परिस्थिती नियंत्रणात आणली.

### आळंदी नगरपरिषद उपाध्यक्षपदी सुजाता तापकीर

**चाकण :** आळंदी नगरपरिषद उपाध्यक्षपदी भाजपच्या नगरसेविका सुजाता तापकीर यांची बिनविरोध निवड झाली. स्वीकृत सदस्यपदासाठी आलेल्या तीन अर्जांपैकी माजी नगरसेवक तुषार घुंडरे पाटील यांचा अर्ज आवश्यक अनुभव नसल्याने बाद ठरविण्यात आला. उर्वरित दोन अर्ज व दोन जागा असल्याने माजी नगराध्यक्ष राहुल चिताळकर पाटील व माजी नगरसेवक संदीप रासकर यांची बिनविरोध निवड जाहीर झाली.

### रात्री दहाची ३०५ क्रमांकाची बस स्टेअरिंग फेल; प्रवाशांचा संताप, प्रशासनावर निष्काळजीपणाचा आरोप

# निगडी–वडगाव मार्गावरील पीएमपीएमएल बस बिघाडाने वारंवार बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**निगडी :** वडगाव दरम्यान धावणाऱ्या पीएमपीएमएल बसेस वारंवार बिघाड होत असल्याने प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. मात्र याकडे पीएमपीएमएल प्रशासन गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप प्रवाशांकडून केला जात आहे. रोजच्या प्रवासात होणाऱ्या अडचणींमुळे प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत असून प्रशासनाची डोळेझाक कायम असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

मंगळवारी रात्री निगडी येथून सुटलेली मार्ग क्रमांक ३०५ वरील रात्री दहाची बस तळेगाव ते वडगाव दरम्यान स्वराज्य नगरी बस थांब्याजवळ अचानक बंद पडली. बसचे स्टेअरिंग फेल झाल्यामुळे ही घटना घडली. प्रवासात असलेल्या प्रवाशांना रस्त्यावरच थांबावे लागले. परिस्थिती लक्षात घेऊन वाहक व चालकाने तत्काळ दुसऱ्या बसची मागणी केली. मात्र पर्यायी बस येण्यासाठी तब्बल एक तास लागल्याने प्रवाशांची मोठी कुचंबणा झाली.




रात्रीचे साडेदहा वाजताची वेळ, त्यात थंडीचे दिवस असल्याने प्रवासी अक्षरशः कुडकुडत रस्त्याच्या कडेला ताटकळत उभे होते. महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच कामावरून परतणारे नोकरदार प्रवासी या प्रकारामुळे विशेष त्रस्त झाले.

"वारंवार अशाच घटना घडतात. बस कधी इंजिन बिघाडामुळे तर कधी ब्रेक किंवा स्टेअरिंग फेलमुळे मध्येच बंद पडते. प्रशासनाला अनेक वेळा तक्रारी करूनही काहीच सुधारणा होत नाही," असा संताप प्रवाशांनी व्यक्त केला.

या प्रकारामुळे केवळ प्रवाशांनाच नव्हे तर वाहक व चालकांनाही अडचणींना सामोरे जावे लागते. अपुऱ्या साधनसुविधा आणि वेळेवर पर्यायी बस न मिळाल्याने त्यांनाही प्रवाशांच्या रोषाला सामोरे जावे लागते. काही प्रवाशांनी तर उशिरा घरी पोहोचण्याच्या भीतीने खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागल्याचे सांगितले.

> रात्रीच्या वेळेतील बसेस सुरक्षित आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम असाव्यात. "प्रवाशांच्या जीविताशी खेळ न करता, बसेस रस्त्यावर सोडण्यापूर्वी त्यांची सखोल तपासणी करावी. अन्यथा अशा घटना पुन्हा घडल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल. —**आरती माने,** प्रवाशी महिला

पीएमपीएमएल प्रशासनाने सर्व बसेसची नियमित व दर्जेदार सर्व्हिसिंग करणे गरजेचे असल्याची मागणी जोर धरू लागली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळेतील बसेस सुरक्षित आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम असाव्यात, अशी अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त होत आहे. "प्रवाशांच्या जीविताशी खेळ न करता, बसेस रस्त्यावर सोडण्यापूर्वी त्यांची सखोल तपासणी करावी. अन्यथा अशा घटना पुन्हा घडल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल," असा इशाराही संतप्त प्रवाशांनी दिला आहे.

## ढगाळ हवामानामुळे अवकाळी पावसाची भीती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**निरगुडसर (ता. आंबेगाव) :** अचानक झालेल्या हवामान बदलामुळे थंडीचा कडाका मोठ्या प्रमाणात कमी होऊन गेल्या सुमारे सात-आठ दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण होत आहे. या बदलत्या हवामानामुळे अवकाळी पावसाची शक्यता वाढली असून रब्बी हंगामातील कांदा, बटाटा, हरभरा, गहू, ज्वारी तसेच भाजीपाला पिकांवर रोगराईचा प्रादुर्भाव होण्याचा धोका निर्माण झाला आहे. परिणामी शेतकरी हवालदिल झाला आहे.

उत्तरेकडून येणाऱ्या शीतलहरींच्या प्रभावामुळे मागील आठवड्यात कडाक्याची थंडी जाणवत होती. मात्र चालू आठवड्यात अचानक वातावरणात बदल होऊन थंडी इतकी कमी झाली की स्वेटर वापरण्याची गरजच उरलेली नाही. सध्या वाढत असलेल्या ढगाळ वातावरणामुळे अवकाळी

**+ रब्बी पिकांवर रोगराईचा धोका**

पावसाची शक्यता वर्तवण्यात येत आहे. थंडी रब्बी पिकांसाठी पोषक ठरत असली तरी ढगाळ हवामानामुळे पिकांवर बुरशीजन्य व किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती आहे.

सध्या शेतांमध्ये गहू, हरभरा, ज्वारी, मका, कांदा, बटाटा तसेच इतर भाजीपाला पिके जोमात आली आहेत. मात्र बदलत्या हवामानामुळे शेतकऱ्यांना रोगनियंत्रणासाठी वारंवार औषधांची फवारणी करावी लागत असून त्यामुळे अतिरिक्त खर्चाचा आर्थिक भार सहन करावा लागत आहे. गेल्या दोन दिवसांपासून सायंकाळी सहा-सात वाजण्याच्या सुमारास तुरळक पावसाचे थेंब पडल्याने शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. जर अवकाळी पावसाने जोर धरला, तर हातातोंडाशी आलेली पिके भूईसपाट होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## प्रत्येक घटकाला संक्रांतीचा गोडवा मिळावा – अमर गोडांबे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** वर्षातील पहिला सण असलेली मकरसंक्रांत हा केवळ उत्सव न राहता समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आनंद, आपुलकी आणि गोडवा पोहोचविण्याचे माध्यम ठरले पाहिजे, असे प्रतिपादन निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे सचिव अमर गोडांबे यांनी केले. भोसरी येथील अंध मुलांच्या शाळेत मकरसंक्रांतीनिमित्त आयोजित सामाजिक उपक्रमाच्या वेळी ते बोलत होते.

पुणे जिल्ह्यात पशु-पक्षी संरक्षणासह विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय असलेल्या निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेच्या वतीने भोसरी येथील अंध मुलांच्या शाळेत मकरसंक्रांत साजरी करण्यात आली. या उपक्रमाअंतर्गत शाळेतील मुलांना तीळगुळ, चिक्की, खाऊ तसेच दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे वाटप करण्यात आले. समाजातील दुर्लक्षित घटकांपर्यंत सणाचा आनंद पोहोचावा, हा या उपक्रमाचा



**+ निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचा भोसरीतील अंध मुलांच्या शाळेत उपक्रम**

मुख्य उद्देश असल्याचे अमर गोडांबे यांनी सांगितले.

यावेळी निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख, सहसचिव सुरज वाघमारे, गोरक्षक व सर्पमित्र आकाश पारडे, मनोज थोरात, अल्ताफ सय्यद, आदित्य वाघमारे, अमोल कुसाळकर, बाळासाहेब मोरे, हेमंत परदेशी, वैभव निकाळजे, आदिनाथ चव्हाण, राहुल शेजवळ, शुभम भेंडे, राहुल गायकवाड, श्रेयस डाडर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच अंध मुलांच्या शाळेचे व्यवस्थापक दत्ता कांबळे यांचीही यावेळी उपस्थिती होती.

तिळगुळ व चिक्कीचे वाटप होत असताना मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद पाहून समाधान मिळाल्याची भावना गोरक्षक व सर्पमित्र आकाश पारडे यांनी व्यक्त केली. "अशा उपक्रमांमधून सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक दृढ होते," असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे व्यवस्थापक दत्ता कांबळे यांनी निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. समाजातील वंचित घटकांसाठी असे उपक्रम सातत्याने राबविले जातील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## तिळगुळ घ्या, गोड बोला...



**ढोकसांगवी (ता. शिरुर) येथील ग्रामदैवत श्री खंडोबा मंदिरात मकर संक्रांतीनिमित्त महिलांनी पारंपरिक ओवस ओवून एकमेकींना तिळगुळ देत सण उत्साहात साजरा केला.**

## शिक्रापूरचे सरपंच रमेश गडदे 'नॉट रीचेबल'

### उपसरपंच निवडीवरून राजकीय चर्चांना उधाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिक्रापूर ग्रामपंचायतीत उपसरपंच पदाच्या निवडीवरून राजकीय वातावरण तापले असून, ऐन वेळी सरपंच रमेश गडदे 'नॉट रीचेबल' झाल्याने गावात विविध चर्चांना उधाण आले आहे. उपसरपंच पदाची निवड प्रक्रिया सुरू असतानाच सरपंच संपर्काबाहेर गेल्याने ही बाब चर्चेचा विषय ठरत आहे.

शिक्रापूर ग्रामपंचायतीचे सरपंचपद मंगलदास बांदल यांच्या गटाकडे असले, तरी ग्रामपंचायतीतील बहुमत माजी सरपंच बापूसाहेब जकाते व आबासाहेब करंजे यांच्या गटाकडे आहे. त्यामुळे आजपर्यंत उपसरपंच पद याच गटाकडे राहिले असून, आतापर्यंत त्यांच्या गटातील नऊ जणांना उपसरपंचपदाची संधी मिळाली आहे. मात्र, अलीकडच्या काळात बांदल गटातील

**आगामी निवडणुकांवर काय परिणाम?**

● सरपंच रमेश गडदे यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आमच्या प्रतिनिधीने वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. आगामी काही दिवसांत होणाऱ्या घडामोडींवर संपूर्ण गावाचे लक्ष लागले असून, या राजकीय खेळीचा परिणाम जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांवर कसा होतो, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

**+ जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या तोंडावर शिक्रापूरात वेगळीच घडामोड**

ग्रामपंचायत सदस्य प्रकाश वाबळे आणि त्रिनयन कळमकर यांनी पॅनल प्रमुखांविरोधात नाराजी व्यक्त करत जकाते-करंजे गटात प्रवेश केल्याने राजकीय समीकरणे बदलली आहेत. रम्यान, उपसरपंच वंदना भुजबळ यांनी राजीनामा दिल्याने उपसरपंच पद रिक्त झाले आहे. हे पद भरले गेल्यास प्रकाश वाबळे किंवा त्रिनयन कळमकर यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात असून, तसे झाल्यास त्याचा थेट परिणाम आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांवर होईल, अशी चर्चा आहे. यामुळे मंगलदास बांदल यांना ऐन निवडणुकीच्या तोंडावर मोठा धक्का बसू शकतो, असे राजकीय जाणकारांचे मत आहे. उपसरपंच पदाची निवडणूक होऊ नये, यासाठी एका गटाकडून प्रयत्न सुरू असल्याची चर्चा असताना, दुसऱ्या गटाकडून लवकरात लवकर निवडणूक घ्यावी, असा तगादा सरपंच रमेश गडदे यांच्यावर लावण्यात येत होता. अशा स्थितीत 'इकडे आड तिकडे विहीर' अशी अवस्था असतानाच दोन दिवसांपूर्वी सरपंच गडदे यांनी उपसरपंच निवडीचा अजेंडा काढत १६ जानेवारी रोजी निवडणूक जाहीर केली.

## दुचाकी चोरांच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या; अनेक चोरींचा पर्दाफाश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळेफाटा :** ओझर येथे गणपती दर्शनासाठी गेलेल्या भाविकाची दुचाकी चोरीस गेल्याची तक्रार दाखल होताच ओतूर पोलिसांनी जलद व प्रभावी कारवाई करत दुचाकी चोरट्यांच्या टोळीला अटक करून त्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत. या कारवाईमुळे परिसरात वाढलेल्या दुचाकी चोरीच्या घटनांना आळा बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

आनंद बाबुराव निमसे (रा. पिंपळवंडी, ता. जुन्नर) हे ओझर येथे दर्शनासाठी गेले असता त्यांची एमएच १४ एफएन ६९७१ क्रमांकाची दुचाकी चोरीस गेली. याप्रकरणी त्यांनी ओतूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानंतर ओतूर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय बातमीदारांच्या मदतीने तपास सुरू केला.

तपासादरम्यान रोहन संदीप सोनवणे (वय १९, रा. मुथाळने) व एक विधीसंघर्षित बालक यांना

**+ सीसीटीव्ही, तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या मदतीने कारवाई; अनेक दुचाकी चोरींचा पर्दाफाश**

ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी खाकी वर्दीचा हिसका दाखवताच आरोपींनी सदर गुन्ह्यासह आळेफाटा व अकोले पोलीस स्टेशन हद्दीतही दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींकडून चोरीस गेलेला मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे.

ही यशस्वी कारवाई पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या सूचनेनुसार करण्यात आली. ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार भरत सूर्यवंशी, अमोल शिंदे, नरेंद्र गोराने, भारती भवारी, देविदास खेडकर, मनोज राठोड व योगेश उकिरडे यांनी ही उल्लेखनीय कामगिरी पार पाडली.

## भारतीय ज्ञान प्रणालीतून 'गुलामगिरीची मानसिकता' संपविण्याचे आवाहन–डॉ. देवळणकर

### बी.जे.एस. महाविद्यालयाच्या शिबिरात ८ राज्यांतील २१५ संशोधकांचा सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वाघोली :** वाघोली (ता. हवेली) येथे ब्रिटिशकालीन शिक्षणपद्धतीमुळे भारतीय संस्कृतीला दुय्यम स्थान देत भारतीयांच्या मनात न्यूनगंड व गुलामगिरीची मानसिकता रुजवली गेली. आता काळाची गरज म्हणजे पाठ्यपुस्तकांचे 'निर्वासहतीकरण' करून समृद्ध, शाश्वत आणि आत्मविश्वासपूर्ण भारतीय ज्ञान परंपरेचे पुनरुज्जीवन करणे, असे परखड मत उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर यांनी व्यक्त केले.

भारतीय जैन संघटना संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय (बी.जे.एस.) व महाराष्ट्र शासन पुरातत्व विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भारतीय ज्ञान प्रणाली (IKS)' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय शिबिरात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या शिबिरात महाराष्ट्र, राजस्थान, मध्य प्रदेश, कर्नाटक, केरळ, गोवा



यांसह देशातील ८ राज्यांतील २१५ संशोधकांनी ऑनलाइन व ऑफलाइन सहभाग नोंदवला. डॉ. देवळणकर पुढे म्हणाले की, १८३५ मध्ये मेकॉलेने लादलेली शिक्षणपद्धती ही केवळ अभ्यासक्रमापुरती मर्यादित नव्हती, तर तिने भारतीय संस्कृती, इतिहास आणि ज्ञानपरंपरेलाच नाकारले. ही मानसिक गुलामगिरी झुगारून देत भारतीय ज्ञान प्रणालीचे पुनरुज्जीवन करणे, हाच खऱ्या अर्थाने शैक्षणिक स्वातंत्र्याचा आणि विकसित भारताचा पाया आहे.

शिबिरात डॉ. लहू गायकवाड यांनी "भारत हा प्रकाशयात्री आहे. गिरनार शिलालेखापासून उपनिषदांपर्यंत ज्ञानाची अखंड परंपरा येथे वाहते. ज्ञानाला अहंकार जोडला की ऱ्हास सुरू होतो," असे मत मांडले. तर डॉ. ढिकले यांनी "भारताने कधीही शस्त्रबळावर आक्रमण केले नाही, तरीही भारतीय विचार व बौद्ध धर्म २२ देशांपर्यंत पोहोचला. हा आपल्या संस्कृतीचा विजय आहे," असे सांगितले.

भारतीय इतिहास संशोधन परिषद (ICHR) चे निलेश जाधव यांनी शिबिरातील उत्कृष्ट शोधनिबंधांचे पुस्तक स्वरूपात प्रकाशन करण्यात येणार असल्याची माहिती दिली. प्रकल्प व्यवस्थापक सुरेश साळुंके यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी संस्था सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले.

## कौलीमळा अवसरी खुर्द येथे नर बिबट्या जेरबंद; शेतकऱ्यांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** कौलीमळा, अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) परिसरात पावणे दोन वर्षांच्या प्रतिक्षेनंतर नर जातीचा सुमारे दीड ते दोन वर्षे वयाचा बिबट्या अखेर पिंजऱ्यात जेरबंद झाला आहे. बिबट्या अडकल्याने परिसरातील शेतकरी व नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे.

१८ नोव्हेंबर रोजी रविंद्र वाळके यांच्या घरासमोरील पोर्चमध्ये तीन बिबटे सीसीटीव्हीमध्ये कैद झाले होते. त्यानंतर वन परिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल प्रदीप कासारे व वनरक्षक शिवाजी ढोले यांनी पिंजरा लावला होता. मात्र ६ डिसेंबर रोजी पुन्हा बिबट्या दिसूनही पिंजऱ्याकडे न जाता तो रस्त्याने निघून गेला. त्यानंतर ७ डिसेंबर रोजी जयसिंग भोर यांच्या शेतात पिंजरा हलवण्यात आला.

मागील तीन दिवसांपासून अशोक वाळके यांच्या शेतात धनगरांचा वाडा असल्याने भक्ष्याच्या शोधात बिबट्या परिसरात आला असावा आणि पिंजऱ्यात अडकला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. सकाळी सातच्या सुमारास जोराचा आवाज ऐकू आल्याने धनगरांनी पाहणी केली असता बिबट्या अडकल्याचे निदर्शनास आले.

### दिवंगत विलासराव तांबे फार्मा कप २०२५-२०२६ प्रथम राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

## मैदानावर जिंका किंवा शिका; पण कधीही हार मानू नका – डॉ. गणेश दामा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी, ओतूर यांच्या वतीने आयोजित दिवंगत विलासराव तांबे फार्मा कप २०२५–२०२६ या प्रथम राज्यस्तरीय फार्मा क्रीडा स्पर्धेची सांगता मंगळवारी (दि. १३) मोठ्या उत्साहात झाली. "मैदानावर जिंका किंवा शिका; पण कधीही हार मानू नका. कारण सातत्याने प्रयत्न करणारा खेळाडूच खरा विजेता असतो," असे प्रेरणादायी प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश दामा यांनी केले.

दि. ११ ते १३ जानेवारी २०२६ या तीन दिवसांत पार पडलेल्या या क्रिकेट स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील नामांकित फार्मसी महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. परिक्रमा फार्मसी काष्टी, मातोश्री फार्मसी कर्जुले हरिया, इंदिरा फार्मसी पुणे, रसिकलाल माणिकचंद धारिवाल फार्मसी पिंपरी-चिंचवड, दत्तकला फार्मसी भिगवण, सिंहगड फार्मसी वडगाव (पुणे), कृष्णाराव भेगडे फार्मसी तळेगाव दाभाडे, मॉडर्न फार्मसी निगडी, इंदिरानगर फार्मसी उल्हासनगर, डॉ. कोळपे फार्मसी कोळपेवाडी, स्कूल ऑफ फार्मसी बारामती, लोकनेते




दादा पाटील फराटे कॉलेज ऑफ फार्मसी मांडवगण फराटा, चंद्रभागा कॉलेज ऑफ फार्मसी बारामती आदी महाविद्यालयांनी स्पर्धेत सहभाग घेतला. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. गणेश दामा, महिला शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय देवकर, शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. खरात, प्रसिद्ध गोल्ड मेडलिस्ट बॉक्सर डॉ. व्यंकटी राम जाधव, तसेच प्रसिद्ध स्क्वॅशपटू व इतिहासतज्ज्ञ गोल्ड मेडलिस्ट डॉ. नेहा व्यंकटी जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रेक्षकांची मने जिंकली. विजेत्या संघाला आकर्षक करंडक, रोख रक्कम १५,५५५ रुपये व प्रमाणपत्र देण्यात आले. द्वितीय क्रमांक शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी, ओतूर संघाने पटकावला असून त्यांना आकर्षक करंडक, रोख रक्कम ११,१११ रुपये व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. समारोपप्रसंगी उत्कृष्ट खेळाडूंचा विशेष सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट गोलंदाज – शिखर थोरात, उत्कृष्ट फलंदाज – ऋषिकेश नाटू, तर उत्कृष्ट खेळाडू – जय थोरात यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. पारितोषिक वितरण ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे, प्रसिद्ध उद्योगपती राहुल काकडे, प्राचार्य डॉ. गणेश दामा, डॉ. रमेश काकड व डॉ. खरात यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष विशाल तांबे व मानद सचिव वैभव तांबे यांनी विजेत्या व सहभागी सर्व संघांचे अभिनंदन करत, भविष्यातही अशा क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून खेळाडूंना प्रोत्साहन दिले जाईल, असा विश्वास व्यक्त केला. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ. सुमित जोशी, प्रा. संतोष कर्पे, प्रा. अजिंक्य दिघे, वैभव फापाळे, प्रा. गौरव गाढवे, प्रा. वृषभ हुप्परगे, प्रा. प्रसाद मते तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभल्याचे डॉ. गणेश दामा यांनी नमूद केले.

## सारांश वृत्त

### राष्ट्रपती मुर्मू १६ तारखेला जयपूरला



**जयपूर :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू १६ जानेवारी रोजी जयपूरला भेट देतील आणि एका धार्मिक कार्यक्रमाला उपस्थित राहतील, असे बुधवारी एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे. तिच्या भेटीदरम्यान, ती रामानंद मिशनद्वारे आयोजित १,००८ कुंडांच्या हनुमान महायज्ञात सहभागी होईल. शुक्रवारी दुपारी ती जयपूरला पोहोचेल आणि धार्मिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी सीकर रोडवरील हरमडा येथे जाण्यापूर्वी लोकभवनात जाईल.

### कर्नाटक सरकारच्या विरोधात निदर्शने

**बंगळुरू :** काँग्रेस सरकारवर प्रशासकीय अपयश, कायदा आणि सुव्यवस्थेचा बिघाड आणि पोलिस यंत्रणेचा गैरवापर केल्याचा आरोप करत भाजपने मंगळवारी १७ जानेवारी रोजी बल्लारीमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्याचे आवाहन केले. भाजपचे प्रदेशाध्यक्ष बीवाय विजयेंद्र यांनी सांगितले की, नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. आम्ही १७ जानेवारी रोजी बल्लारीमध्ये मोठ्या प्रमाणात निषेधाचे आवाहन करत आहोत, असे शिकारीपुरा आमदार म्हणाले.

### मणिपूरमध्ये कुकी झो समुदायाची रॅली

**चुराचंदपूर :** आदिवासी समुदायाला भेडसावणाऱ्या समस्यांवर राजकीय तोडगा काढण्याची मागणी करत बुधवारी मणिपूरच्या चुराचंदपूर जिल्ह्यात कुकी झो समुदायाच्या हजारो लोकांनी रॅली काढली. निदर्शकांनी जिल्हा मुख्यालय शहरात ४ किमी पेक्षा जास्त प्रवास केला, घोषणा देत आणि विधानमंडळासह केंद्रशासित प्रदेशाची मागणी करणारे फलक हातात घेतले. नंतर, कुकी झो कौन्सिल आणि इंडिजिनस ट्रायबल लीडर्स फोरमच्या नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना एक निवेदन सादर केले.

## दिल्ली, काश्मीरसह अनेक राज्यांत तापमानात घट

# उत्तरेत थंडीची लाट; जनजीवन विस्कळीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** बुधवारी उत्तर भारतातील बहुतांश भागात तीव्र थंडीची लाट पसरली. दिल्ली, काश्मीर, राजस्थान, हरियाणा आणि पंजाबमध्ये तापमानात लक्षणीय घट झाली असून अनेक ठिकाणी दाट धुक्यामुळे जनजीवन विस्कळित झाले.

दिल्लीमध्ये किमान तापमान ३.८ अंश सेल्सिअसपर्यंत घसरले असून ते सरासरीपेक्षा ३.६ अंशांनी कमी आहे, अशी माहिती भारतीय हवामान खात्याने दिली. सफदरजंग परिसरात हंगामातील सर्वात कमी तापमानाची नोंद झाली. पालममध्ये ४.४, लोधी रोड येथे ३.६, रिजमध्ये ४.६ तर अयानगरमध्ये ४ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदवले गेले. राजधानीत कमाल तापमान २० अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याचा अंदाज आहे.

थंडीबरोबरच दिल्लीतील हवेची गुणवत्ताही घसरली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माहितीनुसार, हवा गुणवत्ता निर्देशांक ३५४ इतका नोंदवला गेला असून तो 'अत्यंत वाईट' श्रेणीत आहे. ३३ निरीक्षण केंद्रांवर हवा अत्यंत वाईट असल्याचे दिसून आले, त्यापैकी चार ठिकाणी 'गंभीर' तर दोन ठिकाणी 'खराब' श्रेणी नोंदवली गेली. जहांगीरपुरी येथे सर्वाधिक ४२० इतका एक्यूआय नोंदवण्यात आला.

काश्मीर खोऱ्यातही तीव्र थंडीचा कहर सुरू असून दाल सरोवरासह अनेक जलस्रोत गोठले आहेत. सध्या खोरे 'चिल्ला-ए-कलान' या ४० दिवसांच्या कडाक्याच्या थंडीच्या कालखंडात असून हा काळ ३० जानेवारीपर्यंत राहणार आहे. मंगळवारी रात्री श्रीनगरमध्ये उणे ५.२ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. दक्षिण काश्मीरमधील शोपियान येथे उणे ७.५ अंश सेल्सिअससह सर्वाधिक थंडी होती. पहलगाममध्ये उणे ६, गुलमर्गमध्ये उणे ३.८ आणि सोनमर्गमध्ये उणे २.२ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले. काझीगुंड, कुपवाडा आणि इतर भागांतही तापमान शून्याखाली गेले. दरम्यान, १६ जानेवारीपासून पश्चिमी विक्षोभाचा परिणाम जाणवण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

राजस्थानमध्येही थंडीची तीव्रता कायम आहे. बिकानेर जिल्ह्यातील लंकरनसर येथे किमान तापमान १.४ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. राज्यातील बहुतांश भागात पारा ५ अंशांच्या खाली होता. फतेहपूर (२.२), नागौर (२.६), अलवर (३), करौली (३.२), गंगानगर (३.५) आणि झुनझुनू (३.९) अंश सेल्सिअस अशी किमान तापमानाची नोंद झाली. काही भागांत हलक्या ते मध्यम धुक्याचेही वातावरण होते.

हरियाणामध्ये हिसार येथे रात्रीचे तापमान ०.५ अंश सेल्सिअसपर्यंत घसरले असून ते सरासरीपेक्षा सहा अंशांनी कमी आहे. नारनौल, भिवानी, गुरुग्राम, अंबाला, कर्नाल आणि रोहतक येथेही कडाक्याची थंडी जाणवत आहे. धुक्यामुळे हरियाणा आणि शेजारील पंजाबमध्ये सकाळच्या वेळी दृश्यमानता कमी झाली. पंजाबमध्ये भटिंडा आणि फरीदकोट येथे ३.२ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. अमृतसर, लुधियाना, पटियाला आणि होशियारपूरसह अनेक शहरांत तापमान सरासरीपेक्षा चार अंशांनी कमी होते. चंदीगडमध्येही बुधवारी किमान तापमान ३.८ अंश सेल्सिअस नोंदवले गेले.

# ममता बॅनर्जी यांच्याविरुद्ध कारवाई करण्याचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालचे विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याविरुद्ध मानहानीची कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. मानहानी नोटीसीला उत्तर देण्यासाठी दिलेली मुदत संपूनही मुख्यमंत्र्यांकडून कोणतेही उत्तर न आल्यामुळे हा निर्णय घेतल्याचे त्यांनी बुधवारी सांगितले.

एक्सवरील पोस्टमध्ये अधिकारी यांनी म्हटले की, मुख्यमंत्र्यांनी उत्तर न दिल्याने कोळसा घोटाळ्याशी आपल्याला जोडणारे त्यांचे आरोप काल्पनिक आणि निराधार असल्याचे स्पष्ट झाले आहे. "मानहानीच्या नोटीसीद्वारे दिलेला वेळ आता संपला आहे. उत्तर देण्यास असमर्थ राहिल्याने ममता बॅनर्जी यांचे आरोप त्यांच्या अविचारी मानसिकतेचे उत्पादन असल्याचे उघड झाले आहे. आता न्यायालयात कायदेशीर परिणामांना सामोरे जाण्यासाठी तयार राहा," असे त्यांनी नमूद केले.

शुक्रवारी अधिकारी यांनी मुख्यमंत्री बॅनर्जी यांना कायदेशीर नोटीस पाठवून ७२ तासांच्या आत कोळसा तस्करी प्रकरणात त्यांच्या कथित सहभागाबाबत पुरावे सादर करण्याची मागणी केली होती. अन्यथा दिवाणी व फौजदारी मानहानीची कारवाई सुरू केली जाईल, असा इशाराही देण्यात आला होता. यापूर्वीच्या एका पोस्टमध्ये अधिकारी यांनी हे आरोप अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) सुरू असलेल्या चौकशीवरून लक्ष विचलित करण्याचा "हताश प्रयत्न" असल्याचे म्हटले होते. त्यांनी मुख्यमंत्र्यांची विधाने बदनामीकारक, राजकीय हेतूने प्रेरित आणि सार्वजनिक चर्चेला हानी पोहोचवणारी असल्याचा आरोप केला होता.

दरम्यान, कोळसा घोटाळ्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि शुभेंदू अधिकारी यांचा सहभाग असल्याचा आरोप मुख्यमंत्री ममता बॅनर्जी सार्वजनिकरित्या केल्यानंतर ही नोटीस पाठवण्यात आली.

# सुकमात २९ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

## 'पुना मार्गेम' उपक्रमाला यश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सुकमा :** छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात बुधवारी २९ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. बेकायदेशीर सीपीआय (माओवादी) संघटनेच्या पुढील विंगमध्ये सक्रिय असलेले हे कार्यकर्ते 'पुना मार्गेम' (पुनर्वसन ते सामाजिक पुनर्एकात्मता) उपक्रमांतर्गत वरिष्ठ पोलिस व सीआरपीएफ अधिकाऱ्यांसमोर मुख्य प्रवाहात परतले.

सुकमाचे पोलिस अधीक्षक किरण चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्य सरकारच्या आत्मसमर्पण व पुनर्वसन धोरणामुळे प्रभावित होऊन या नक्षलवाद्यांनी हिंसाचाराचा मार्ग सोडण्याचा निर्णय घेतला. आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये दंडकारण्य आदिवासी किसान मजदूर संघटना या माओवाद्यांच्या पुढील शाखेचा गोगुंडा परिसरातील प्रमुख पोडियम बुधरा याचाही समावेश असून त्याच्यावर दोन लाख रुपयांचे बक्षीस होते. उर्वरित आत्मसमर्पणकर्ते मिलिशिया आणि जनता सरकार या माओवादी संघटनेच्या विविध घटकांशी संबंधित होते. गोगुंडा परिसरात अलीकडेच सुरक्षा छावणी स्थापन केल्याने नक्षलविरोधी कारवायांना वेग आला असून, सातत्यपूर्ण शोध मोहिमा व दबावामुळे माओवादी हालचालींना मोठा फटका बसल्याचे चव्हाण यांनी सांगितले. कठीण व दुर्गम भूभागामुळे गोगुंडा परिसर पूर्वी दरभा विभागातील माओवाद्यांचा सुरक्षित व धोरणात्मक तळ मानला जात होता. मात्र सुरक्षा छावणीच्या स्थापनेनंतर हा गड उद्ध्वस्त झाला आहे.

यापूर्वी ८ जानेवारी रोजी दंतेवाडात ६३, तर ७ जानेवारी रोजी सुकमामध्ये २६ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले होते. २०२५ मध्ये १,५०० हून अधिक नक्षलवाद्यांनी शस्त्रे खाली ठेवली आहेत.

# कर्नाटकात नेतृत्वबदलाच्या चर्चांना पुन्हा उधाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बेंगळुरू :** कर्नाटकात मुख्यमंत्रीपदावरून सुरू असलेला सत्तासंघर्ष पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार आणि माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांची राहुल गांधी यांच्याशी झालेली भेट आणि त्यानंतर समोर आलेले व्हिडिओ व सोशल मीडिया पोस्ट यामुळे राज्यातील नेतृत्वबदलाच्या अटकळींना नव्याने बळ मिळाले आहे.

राहुल गांधींशी झालेल्या अल्प आणि खाजगी संवादानंतर डी. के. शिवकुमार यांनी सोशल मीडियावर सूचक पोस्ट करत "प्रयत्न अपयशी ठरू शकतात, पण प्रार्थना कधीही अपयशी होत नाहीत," असे म्हटले. म्हैसूर विमानतळावर दोन्ही नेत्यांची भेट झाल्यानंतर लगेचच ही पोस्ट शेअर करण्यात आल्याने राजकीय अर्थ लावले जात आहेत. या दरम्यान मुख्यमंत्री सिद्धरामय्या नेतृत्वबदलाच्या चर्चांना सातत्याने नाकारत असले तरी, या भेटीने सत्ताबदलाच्या चर्चांना पुन्हा हवा मिळाली आहे. मंगळवारी राहुल गांधी तामिळनाडूतील गुडालूरला रवाना होण्यापूर्वी म्हैसूरच्या मंडकल्ली विमानतळावर पोहोचले. तेथे सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांनी त्यांचे स्वागत केले. काही मिनिटांतच राहुल गांधी हेलिकॉप्टरने पुढे निघून गेले. मात्र, नंतर दिल्लीहून परतताना राहुल गांधी पुन्हा म्हैसूरला आले आणि त्यावेळी धावपट्टीवर डी. के. शिवकुमार यांच्याशी सुमारे तीन मिनिटे थेट चर्चा झाली. त्यानंतर काही वेळातच सिद्धरामय्या तेथे पोहोचले. या चर्चेमुळे राजकीय अंदाजांना वेग आला आहे. डी. के. शिवकुमार यांनी बैठकीचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले, मात्र दोन्ही नेत्यांनी माध्यमांशी बोलणे टाळले. दुसरीकडे, सिद्धरामय्या यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की मुख्यमंत्रीपदाबाबत कोणताही संभ्रम नाही आणि अंतिम निर्णय पक्षाची हायकमांड घेईल.

विमानतळावर शक्तिप्रदर्शन होऊ नये यासाठी काँग्रेस आणि पोलिसांनी खबरदारी घेतली. मंगळुरू विमानतळावर झालेल्या घोषणाबाजीची पुनरावृत्ती टाळण्यासाठी, कार्यकर्त्यांचा परिसरात प्रवेश रोखण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, सिद्धरामय्या सध्या गोंधळाच्या मनःस्थितीत नसून, राहुल गांधींशी झालेल्या चर्चेत त्यांनी रोज नवे वाद निर्माण होऊ नयेत आणि लवकरच कायमस्वरूपी तोडगा निघावा, यावर भर दिला. दुसरीकडे, मुख्यमंत्रीपदाचे इच्छुक असलेले डी. के. शिवकुमार यांनी आपले प्रयत्न सुरूच ठेवण्याचे संकेत दिले आहेत.

# ...तर आकाश कोसळणार नाही!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** राजकीय सल्लागार कंपनी आय-पीएसीवरील अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) छाप्यांप्रकरणी आज, बुधवारी, कोलकाता उच्च न्यायालयात सुनावणी होत आहे. या प्रकरणात ईडी आणि सत्ताधारी तृणमूल काँग्रेस या दोन्ही पक्षांनी स्वतंत्र याचिका दाखल केल्या आहेत. न्यायालयात गोंधळ आणि गर्दीमुळे ९ जानेवारी रोजी सुनावणी होऊ न शकल्याने न्यायमूर्ती शुभ्रा घोष यांनी आजची तारीख निश्चित केली होती.

सुनावणीदरम्यान ईडीने गंभीर आरोप करत दावा केला की, आय-पीएसीचे संचालक प्रतीक जैन यांच्या निवासस्थानी छापे सुरू असताना मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी तेथे अचानक उपस्थिती लावून तपासात अडथळा आणला. मुख्यमंत्री घटनास्थळी गेल्या आणि महत्त्वाचे पुरावे घेऊन गेल्याचा आरोपही ईडीने न्यायालयात केला. याउलट, ममता बॅनर्जी यांनी ईडीची कारवाई बेकायदेशीर असल्याचा दावा करत तपास यंत्रणेने अधिकारांची मर्यादा ओलांडल्याचे सांगितले आहे.

दरम्यान, ईडीने जप्त केलेल्या निवडणुकीशी संबंधित संवेदनशील डेटाच्या संरक्षणासाठी तृणमूल काँग्रेसने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. हा डेटा पूर्वग्रहदूषित पद्धतीने वापरला जाऊ नये किंवा प्रसारित केला जाऊ नये, अशी मागणी पक्षाने केली आहे.

सुनावणी पुढे ढकलण्याची मागणी करताना ईडीतर्फे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांचा संदर्भ दिला. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित होऊ शकते, त्यामुळे उच्च न्यायालयाने सध्या सुनावणी करू नये, असा युक्तिवाद त्यांनी मांडला. "आज सुनावणी झाली नाही तर काही आकाश कोसळणार नाही," असेही ते म्हणाले.

## अहिल्याबाई होळकरांच्या वंशजांकडून निषेध

# मणिकर्णिका घाट पाडण्यावर आक्षेप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भोपाळ :** वाराणसीतील गंगा नदीकाठी असलेल्या ऐतिहासिक स्मशानभूमीच्या पुनर्विकास आणि आधुनिकीकरणाच्या शहर प्रशासनाच्या योजनांना आता तीव्र विरोध होत आहे. मराठा राणी पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई होळकर यांच्या वंशजांनी प्रसिद्ध मणिकर्णिका घाट पाडण्यास ठाम आक्षेप घेतला असून, या कारवाईचा तीव्र निषेध नोंदवला आहे.

इंदूर येथील खसगी देवी अहिल्याबाई होळकर चॅरिटीज ट्रस्टने याबाबत अधिकृत निवेदन जारी केले आहे. १९६२ मध्ये होळकर राज्याच्या अखत्यारीतील मालमत्तांचे व्यवस्थापन करण्यासाठी या ट्रस्टची स्थापना करण्यात आली होती.

ट्रस्टचे अध्यक्ष यशवंतराव होळकर यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनात मणिकर्णिका घाटाचे ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे.

निवेदनानुसार, मणिकर्णिका घाटाचा जीर्णोद्धार १७९१ साली पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई होळकर यांनी केला होता. देशभरात त्यांनी बांधलेल्या किंवा पुनर्बांधलेल्या शेकडो धार्मिक स्थळांपैकी हे एक अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. याच घाटावर त्यांनी पवित्र गंगा मातेच्या पूजेसाठी स्वतःच्या प्रतिमेचे पुतळे उभारले होते, असेही ट्रस्टने स्पष्ट केले आहे.

ट्रस्टने विध्वंसाची पद्धतही प्रश्नांकित केली आहे. १० जानेवारी २०२६ रोजी कोणतीही पूर्वसूचना किंवा अधिकृत इशारा न देता, कथितपणे महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार मणिकर्णिका घाट काही तासांतच पाडण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कारवाईत स्थळाचा इतिहास, धार्मिक मूल्ये आणि भावनिक संदर्भ पूर्णपणे दुर्लक्षित केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

"पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई होळकर यांचे वंशज, खसगी ट्रस्ट आणि इंदूरचे होळकर राजघराणे या लज्जास्पद आणि अनादरपूर्ण कृत्याचा तीव्र निषेध करतात," असे ठाम शब्दांत ट्रस्टने म्हटले आहे. तसेच, विध्वंसात नुकसान झालेल्या देवी अहिल्याबाईंच्या पुतळ्यांची स्थिती अत्यंत दयनीय असून, त्या पुतळ्या तातडीने परत मिळवण्यासाठी आवश्यक कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान, पौराणिकदृष्ट्या 'महाशमाशन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मणिकर्णिका घाटावरील नूतनीकरणाच्या कामाचा भाग म्हणून देवी अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्याची रचना पाडण्यात आल्याच्या आरोपांनंतर वाराणसी जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

# इराण-अमेरिका यांच्यातील तणावात वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमध्ये सुरू असलेल्या सरकारविरोधी निदर्शनांना उघड पाठिंबा दिल्याने पश्चिम आशियातील तणाव आणखी तीव्र झाला आहे. निदर्शकांनी संस्थांवर ताबा घ्यावा, मदत लवकरच मिळेल, असे संकेत ट्रम्प यांनी दिल्याने अमेरिका इराणला कोणत्या स्वरूपाची मदत देणार, याबाबत तर्कवितर्क सुरू झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर पाकिस्तानमध्ये चिंता वाढली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष उफाळल्यास त्याचे थेट परिणाम पाकिस्तानवर होतील, अशी भीती इस्लामाबादमधील लष्करी व राजकीय नेतृत्व व्यक्त करत आहे. अनेक आघाड्यांवर अडचणींना सामोरे जाणाऱ्या पाकिस्तानने या संकटावर चर्चा करण्यासाठी उच्चस्तरीय बैठक बोलावली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, या बैठकीला फील्ड मार्शल व लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर, आयएसआय प्रमुख व राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जनरल असीम मलिक, दक्षिण कमांडचे लेफ्टनंट जनरल राहत नसीम, लष्करी गुप्तचर विभागाचे प्रमुख तसेच जनरल स्टाफचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत पाकिस्तान-इराण सीमेवरील परिस्थिती ही प्रमुख चिंता म्हणून मांडण्यात आली.

अधिकाऱ्यांनी इशारा दिला की, पाकिस्तान आधीच ड्युरंड रेषेवर अफगाणिस्तानसोबत तणावाचा सामना करत आहे. अशा वेळी इराण सीमेवर आणखी एक संघर्ष उद्भवल्यास देशासाठी ते अत्यंत धोकादायक ठरू शकते. दोन सीमा आघाड्यांवर एकाच वेळी दबाव वाढल्यास सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर परिणाम होऊ शकतात.

बैठकीत आणखी एक संवेदनशील मुद्दा चर्चेला आला. जर अमेरिका इराणविरोधात लष्करी कारवाई करण्याचा निर्णय घेतला, तर पाकिस्तानच्या हवाई क्षेत्राचा किंवा लष्करी तळांचा वापर करण्याची मागणी होऊ शकते, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली. अशा परिस्थितीत पाकिस्तानसमोर कठीण निर्णय उभा राहील. अमेरिकेला सहकार्य केल्यास देशांतर्गत राजकीय विरोध तीव्र होण्याची शक्यता आहे, तर नकार दिल्यास आंतरराष्ट्रीय दबाव वाढू शकतो.

## शेअर बाजारात घसरण कायम

**मुंबई :** वाढत्या भू-राजकीय तणावादरम्यान आयटी, वापर आणि निवडक बँकिंग ब्लू-चिप समभागांमध्ये कमकुवतपणामुळे बुधवारी इक्विटी बेंचमार्क निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये घसरण झाली, ज्यामुळे मागील दिवसातील तोटा वाढला. याशिवाय, सतत होणारा परदेशी निधीचा प्रवाह आणि नवीन टॅरिफ-संबंधित अनिश्चितता यामुळे गुंतवणूकदार अस्वस्थ झाले आहेत. बीएसई सेन्सेक्स २४४.९८ अंकांनी घसरून ८३,३८२.७१ वर स्थिरावला.

# विधवा सुनेलाही सासरच्या मालमत्तेत अधिकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने विधवा सुनेच्या सासरच्या मालमत्तेतून पोटगी मिळण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. न्यायाधीश पंकज मित्तल आणि एस. व्ही. एन. भट्टी यांच्या खंडपीठाने मुलाच्या मृत्यूनंतरही विधवा सुनेला सासरच्या मालमत्तेतून उदरनिर्वाह मिळावा, असा आदेश दिला.


खंडपीठाने मनुस्मृतीचा दाखला देत स्पष्ट केले की, "मुलाशी लग्न करणारी सून ही मुलीच्या बरोबरीची मानली जाते, आणि पतीचे पालक म्हणून सासऱ्यांवर तिच्या सन्मान व पालनपोषणाची जबाबदारी असते." त्यामुळे हिंदू दत्तक व देखभाल कायदा, १९५६ अंतर्गत सासरच्या लोकांना विधवा सुनेला पोटगी देण्याचा कायदेशीर अधिकार आहे.

प्रश्न होता की, सासरे मृत्युमुखी पडले आणि विधवा सून राहिली, तर तिला सासरच्या मालमत्तेतून पोटगी मिळेल का? याचिकाकर्त्याने युक्तिवाद केला की सासऱ्याच्या मृत्यूनंतर सुनेला अधिकार नाही. मात्र सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावला आणि पतीच्या मृत्यूच्या वेळेनुसार भेदभाव करणे अन्याय्य असल्याचे नमूद केले. हिंदू दत्तक व देखभाल कायद्याच्या कलम २२ मध्ये मृत्यू पावलेल्या हिंदूच्या अवलंबितांच्या पोटगीची तरतूद आहे. अवलंबितांमध्ये सुनेचा समावेश असतो.

## पुलना-भ्युंदर वनक्षेत्रात लागलेला वणवा सहाव्या दिवशीही आटोक्यात नाही

# व्हॅली ऑफ फ्लॉवर्स लगत जंगल धुमसतेच...

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**डेहराडून :** उत्तराखंडमधील जगप्रसिद्ध व्हॅली ऑफ फ्लॉवर्स नॅशनल पार्कलगत असलेल्या पुलना-भ्युंदर वनक्षेत्रात लागलेला वणवा सहाव्या दिवशीही पूर्णपणे आटोक्यात आलेला नाही. दुर्गम आणि खडतर भूभागामुळे जमिनीवरून घटनास्थळी पोहोचणे अवघड ठरत असून, आग विझवण्यासाठी प्रशासनाला हवाई हस्तक्षेप किंवा पाऊस-बर्फवृष्टीसारख्या नैसर्गिक घटकांवर अवलंबून राहावे लागत आहे.

९ जानेवारी रोजी प्रथम दिसलेली ही आग सुमारे ३,५०० मीटरपेक्षा अधिक उंचीवरील सुमारे १५ हेक्टर वनक्षेत्रात पसरली आहे. उपग्रह छायाचित्रांवरून संरक्षित व्हॅली ऑफ फ्लॉवर्स क्षेत्रासमोरील टेकडीवर आग लागल्याची पुष्टी झाली आहे. मात्र, खडकाळ पृष्ठभाग, तीव्र उतार आणि सतत दगड-खडक कोसळण्याचा धोका यामुळे वन विभागाच्या पथकांना वारंवार माघार घ्यावी लागली.

वनसंरक्षक आकाश वर्मा यांनी सांगितले की, कोरड्या हवामानामुळे आणि बर्फाचे आवरण कमी झाल्याने येथील कोरडे गवत व जुने ओक वृक्ष अत्यंत ज्वलनशील झाले आहेत. "या भागात थेट पोहोचणे मोठे आव्हान आहे. त्यामुळे आग बाजूकडील जंगलात पसरणार नाही, यावर आमचे लक्ष केंद्रित आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

प्राथमिक टप्प्यात यमुना-गंगोत्री नदीच्या प्रवाहावर तात्पुरते क्रॉसिंग उभारून पथकांनी पुढे जाण्याचा प्रयत्न केला. हमवंती दुसऱ्या बीटपर्यंत पोहोचण्यात यश आले, मात्र कठीण परिस्थितीमुळे तेथेच माघार घ्यावी लागली. स्थानिक महिला मंगल दलाच्या मदतीने सोमवारी कायमस्वरूपी पूल दुरुस्त करण्यात आला, तरीही प्रत्यक्ष कारवाईत अडचणी कायम आहेत. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वन विभागाने राज्य प्रशासनाला माहिती दिली आहे. चमोली जिल्हाधिकारी गौरव कुमार यांनी राज्य सरकारकडे अहवाल पाठवला असून, मंगळवारी हवाई पाहणी करून पाण्यावर बॉम्बफेक करण्याची शक्यता तपासण्यात आली. यानंतर प्रधान सचिव (वन) आर. के. सुधांशू यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. मुख्य वनसंरक्षक (वनअग्नि नियंत्रण) सुशांत पटनायक यांनी सांगितले की, युसीएडीएच्या हेलिकॉप्टरद्वारे आग विझवण्याचा तातडीचा प्रयत्न केला जाणार आहे. आवश्यक असल्यास भारतीय हवाई दलाची मदत घेण्यासही प्रशासन तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपत्ती व्यवस्थापन सचिव विनोद कुमार सुमन यांनीही हवाई दलाकडे मदतीची मागणी करण्यात आल्याचे सांगितले.

दरम्यान, अधिकाऱ्यांनी नागरिकांना दिलासा देत सांगितले की व्हॅली ऑफ फ्लॉवर्स नॅशनल पार्कचा मुख्य भाग पूर्णपणे सुरक्षित आहे. आगीचे ठिकाण उद्यानापासून सुमारे सात किलोमीटर, तर जमिनीच्या अवघड मार्गाने सुमारे २२ ते २५ किलोमीटर अंतरावर आहे. यमुना-गंगोत्री आणि पुष्पावती या दोन नद्या नैसर्गिक अग्निशामक रेषा म्हणून काम करत असल्याने संरक्षित क्षेत्रात आग पसरण्याची शक्यता नाही, असा प्रशासनाचा दावा आहे. तथापि, उतारावरून जळणारी लाकडे खालील जंगलात आग पसरवू नयेत यासाठी विशेष दक्षता घेण्यात येत आहे. बुधवारी हेलिकॉप्टरद्वारे आणखी एक सविस्तर सर्वेक्षण करण्याचे नियोजन असून, पुढील कारवाई त्यानुसार ठरवली जाणार आहे.